नवप्रभा सोमवार दि. १२ जानेवारी २०१५



दोडामार्ग येथील लक्ष्मीबाई हळबे महाविद्यालयातील युवाईने आज मोठ्या जल्लोषी वातावरणात 'ट्रेडीशनल डे' साजरा केला. कॉलेजमधील अवघी तरुणाई विविधांगी पेहराव व वेशभूषा धारण करून ट्रेडीशनलच्या धुममध्ये सहभागी झाली होती. महाविद्यालय ते दोडामार्ग शहर बाजारपेठ अशी भव्य शोभायात्रा काढून युवाईने जल्लोष साजरा केला. पंचायत समिती सभापती महेश गवस यांच्या उपस्थितीत या ट्रेडीशनल डे चा जल्लोषात समारोप झाला.